## विद्यापीठातील डॉ.एस.एफ.आर. खाद्री पोस्ट डॉक्टरल फेलोशीपकरिता स्वीत्झरलँडच्या दौऱ्यावर कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांच्या हस्ते सत्कार

अमरावती -

विद्यापीठातील भूगर्भशास्त्र विभागप्रमुख तथा आय.क्यु.ए.सी. संचालक डॉ.एस.एफ.आर. खाद्री यांना लॉसेन विद्यापीठ, स्वीत्झरलँडकडून पोस्ट डॉक्टरल फेलोशीप बहाल करण्यात आली असून ते तीन महिन्यांच्या कालावधीकरिता आंतरराष्ट्रीय संशोधन संयुक्त उपक्रमांतर्गत स्वीत्झरलँडच्या दौऱ्यावर गेले आहेत. त्यांचा गौरव म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी शाल, श्रीफळ व पुस्तक देवून डॉ.एस.एफ.आर. खाद्री यांचा विद्यापीठाच्यावतीने सत्कार केला. याप्रसंगी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी तसेच विभागातील प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. खाद्री यांनी आपले पदवी व पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण आंध्रा विद्यापीठ, विशाखापट्टनम येथून पूर्ण केले असून ते सूवर्णपदाचे मानकरी ठरले होते. आय.आय.टी. मुंबई येथून आचार्य पदवी त्यांना मिळाली असून ब्रिटीश कॉऊन्सिलींगची फेलोशीप सुद्धा बहाल करण्यात आलेली आहे. तेहतीस वर्षांपेक्षा जास्त अध्ययन व संशोधनाचा डॉ. खाद्री यांना अनुभव असून इंडियन सायन्स कॉंग्रेस असोसिएशन, कलकत्ता व एम.पी. कॉऊन्सिल ऑफ सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजीकडून त्यांचा 'यंग सायनटिस्ट' हा पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. याशिवाय विद्यापीठाने 'उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार' सुद्धा त्यांना प्रदान केलेला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकवीस संशोधक विद्यार्थ्यांना आचार्य पदवीने सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. खाद्री यांचे आंतरराष्ट्रीय नियतकालीकेमध्ये १०१, राष्ट्रीय नियतकालिकेमध्ये ४६ संशोधनपर लेख तसेच आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये ८८, तर राष्ट्रीय परिषदांमध्ये ३८ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. प्रधान अन्वेषक म्हणून डॉ. खाद्री यांनी प्रिंस्टन विद्यापीठ, यु.एस.ए., एम.आय.टी., यु.एस.ए. आणि लॉसेन विद्यापीठ, स्वीत्झरलँड सोबत आंतरराष्ट्रीय संशोधन सहकार्य स्थापित केले आहे. त्यांचे शोधनिबंध प्रतिष्ठित नियतकालिकेमध्ये प्रकाशित झाले असून त्यांच्या संशोधनाचा इम्पॅक्ट फॅक्टर अव्वल आहे. याशिवाय आय.पी.जी.पी. पॅरिस विद्यापीठासोबत त्यांनी मागील बारा वर्षांपासून आंतरराष्ट्रीय संशोधन समन्वय प्रस्थापित केले आहे.

मानव संसाधन मंत्रालयाकडून डॉ. खाद्री यांना गॅन उपक्रमांतर्गत अनुदान प्राप्त झाले होते, त्यांतर्गत त्यांनी विविध अभ्यासकमांचे आयोजन करुन विदेशातील संशोधकांच्या मार्गदर्शनाचा लाभ येथील विद्यार्थ्यांना प्राप्त करुन दिला. विविध वित्तीय संस्थांकडून १ कोटी रूपयांपेक्षा जास्त अनुदान संशोधन प्रकल्पाकरिता त्यांना मिळाले आहे. डॉ. खाद्री यांनी विद्यापीठाच्या विविध समित्यांवर कार्य केले असून आय.क्यु.ए.सी. संचालक म्हणून पंचवीस पेक्षा जास्त आय.क्यु.ए.सी. ॲक्रेडिएशन अवेअरनेस कार्यशाळेचे आयोजन केले आहे. ते नॅक, बंगलोरच्या पीअर टीमचे सदस्य व जी.एस.आय. चे फेलो आहेत. याशिवाय विद्यापीठाच्या केंद्रीय उपकरण कक्षाचे संस्थापक समन्वयक, रूसाचे समन्वयक, एन.आय.आर.एफ. चे नोडल ऑफिसर, ए.सी.ई. बुलेटिनचे संपादक म्हणून त्यांनी उत्कृष्ट कार्य केले आहे. डॉ.एस.एफ.आर. खाद्री यांचे सार्वत्रिक अभिनंदन होत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०५/१०/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी